

# देशभक्ती आणि राष्ट्रवाद

विनय हर्डीकर

**प्रश्न** – नुकताच पुण्यात लोकमान्य टिळक यांच्या नावाचा पुरस्कार नरेंद्र मोदी यांना दिला गेला. या पुरस्कारावरून वेगवेगळ्या चर्चा झाल्या. त्या निमित्ताने 'टिळक ते मोदी' असा भारतीय राष्ट्रवादाचा प्रवास, त्याचे वेगवेगळे पैलू समजून घ्यायचे आहेत. अशी टीका झाली की, लोकमान्य टिळकांच्या नावाचा हा पुरस्कार नरेंद्र मोदींना देणं योग्य आहे की अयोग्य? हा पुरस्कार सत्पात्र आहे का? तुम्हांला याबद्दल काय वाटतं?

– सर्वप्रथम मी टिळकांच्या स्मृतीला प्रणाम करतो. स्वातंत्र्यलढ्यातील माझ्यावर प्रभाव टाकणारी पहिली व्यक्ती म्हणून लोकमान्य टिळक यांचं स्थान माझ्या आयुष्यात फार मोठं आहे. मी स्वतःला पक्का 'टिळकाइट' समजतो. पुण्याच्या कार्यक्रमामध्ये देश-पातळीवरचे, राज्य-पातळीवरचे दोन पिढ्यांचे बिलंदर राजकारणी स्टेजवर होते. पण कोणीही प्रचलित राजकारणासाठी तो कार्यक्रम वापरला नाही याच्याबद्दल मी त्यांचं साश्चर्य अभिनंदन करतो. बळवंतराव टिळकांचा धाकच असा की त्या कार्यक्रमामध्ये तास-सव्वा तास सगळ्यांच्या तोंडाला 'गच्च लगाम' बसलेला होता.

पुरस्कार सत्पात्र की अपात्र हा मोठा अडचणीचा प्रश्न आहे. एक म्हणजे सध्याचं देशातलं राजकीय वातावरण लक्षात घेता मोदींना पुरस्कार जाहीर झाल्याबरोबरच चर्चा सुरू झाली. त्यानंतर शरद पवार कार्यक्रमाला येणार की

नाही याची चर्चा झाली. मग लोकांना कळलं की, सुशीलकुमार शिंदेही त्या मंडळावर आहेत. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात आता भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तिन्हींचं प्रतिनिधित्व आहे. त्यामुळे एकदम राजकीय चलबिचल सुरू झाली. आणि या कार्यक्रमातून काही राजकीय संकेत मिळतील असं वाटलं. मोदींना पुरस्कार द्यावा की देऊ नये, हा दीपक टिळक म्हणाले त्याप्रमाणे त्यांच्या संस्थेचा निर्णय आहे. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी असा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता की, 'याआधी सर्वोच्च पदावरच्या व्यक्तीने खासगी संस्थांचे पुरस्कार घेतलेले नाहीत. त्यामुळे मोदींनी पुरस्कार स्वीकारणं योग्य नाही.' पण ते हे विसरले की, इंदिरा गांधींना हा पुरस्कार मरणोत्तर देण्यात अला तेव्हा त्यांच्या वारसांनी तो स्वीकारलेला होता. याआधी ज्यांना हा पुरस्कार दिला त्यातल्या अनेकांच्या आपापल्या क्षेत्रातलं कर्तृत्व निर्विवाद होतं. ती यादी मोठी आहे. हा ४१वा पुरस्कार होता. तिथे पवारांनी चांगली टिप्पणी केली की, 'यांच्या यादीमध्ये मोदी जाऊन बसले म्हणून मी त्यांचं अभिनंदन आधीच्या सर्वांच्या तर्फे करतो.' शरद पवारांच्या चाणाक्षपणाचा हा एक चांगला पुरावा आपल्याला मिळून गेला.

"काही माणसं जन्मतः मोठी असतात, काही माणसं स्वकर्तृत्वाने मोठी होतात, काही माणसांवर मोठेपणा लादला जातो," असं शेक्सपिअरने म्हटलेलं आहे. यातच काही माणसं स्वतःला मोठेपणावर लादतात, हा चौथा प्रकारही पाहायला मिळतो. मोदी हे त्यातल्या तिसऱ्या आणि चौथ्या प्रकारामध्ये मोडतील. कर्तृत्वाने मिळवलेला मोठेपणा म्हणायचं झालं तर गुजरातपुरतं त्यांचं कर्तृत्व सिद्ध झालेलं होतं. पण राजकारणामध्ये क्रिकेटप्रमाणे अनेकदा अनपेक्षित घटना घडतात आणि सामना फिरून जातो. त्याप्रमाणे २०१४मध्ये मोदींच्या बाजूने सामना फिरला, २०१९मध्ये त्यांनी तो आपल्या बाजूने फिरवला आणि आता २०२४साठीची तयारी सुरू आहे. पण तो पुरस्कार अपात्र आहे असं काही म्हणता येणार नाही. कारण मग इंदिरा गांधींच्या बाबतीतही हाच प्रश्न विचारता आला असता. जसे इतर काही पुरस्कारप्राप्त व्यक्ती आहेत तशा इंदिरा गांधी या काही कुठल्या विषयामधल्या तज्ज्ञ नव्हत्या, अभ्यासक-संशोधक नव्हत्या, स्वतःचं मोठेपण ज्यामध्ये सिद्ध केलं असं त्यांचं कोणतं कार्यक्षेत्र नव्हतं. मग इंदिरा गांधींना दिलेला पुरस्कार चालला असेल तर मोदींना दिलेला चालला पाहिजे. कारण इंदिरा गांधींचाही एकमेव गुणवत्तानिकष हाच होता की, भारतीय जनतेने त्यांना स्वीकारलेलं होतं. आणि मोदींनाही भारतीय जनतेने स्वीकारलेलं आहे. कुणाला आवडो न आवडो, लोकशाही मार्गाने मोदी दोन वेळा पंतप्रधान झाले आहेत.

टिळकांचा काळ आणि मोदींचा काळ यांच्यामध्ये शंभर वर्षांचं अंतर आहे. त्यामध्ये मुख्य फरक असा आहे की, टिळकांना त्यांच्या काळामध्ये राजकीय जागृती करायची होती. टिळकांनी रानड्यांच्याबद्दल लिहिताना असं म्हटलं होतं की, 'हा देश जेव्हा लोण्याच्या थंड गोळ्यासारखा पडलेला होता त्याला उष्णता देऊन जागृत करण्याचं काम महादेवराव रानडे यांनी केलं.' तर, टिळकांचंही काम जागृती निर्माण करणं हे होतं. असलेली जागृती किंवा असलेली राजकीय परिस्थिती स्वतःच्या फायद्यासाठी, स्वतःच्या पक्षाकडे वळवणं हे मोदींचं काम आहे. 'टिळक हॅड टू क्रिएट हिज डिमांड अँड मोदी इज मॅनेजिंग हिज डिमांड.' ज्या राज्यातून, ज्या समाजातून ते येतात त्या दोन्हींकडे पाहिलं तर 'मॅनेजिंग डिमांड' हे त्या समाजाचं आणि त्या राज्याचं फार मोठं वैशिष्ट्य आहे. त्यामुळे टिळक आणि मोदी यांची तुलना करूच नये, नाही तर मोदी कुठेच टिकायचे नाहीत असं मी स्पष्टपणे इथे नमूद करतो.

तुम्ही राष्ट्रवादाचा प्रवास म्हणत आहात त्याच्याबद्दल आपण पुढे बोलूच. पण राष्ट्रवाद आणि देशभक्ती या दोन वेगळ्या गोष्टी आहेत हे इथे आपण लक्षात घेतलं पाहिजे. देशभक्त आपण सगळेच आहोत. कदाचित सध्या मोदी स्वतःला सर्वश्रेष्ठ देशभक्त म्हणवून घेत असतील! पण म्हणून काही ते राष्ट्रवादी ठरत नाहीत. टिळकांच्या वेळेला 'राष्ट्र' या संकल्पनेची व्याख्या करण्यापासून ते तेव्हाची राष्ट्राची अवस्था आणि पुढे त्याचा विकास कसा करायचा हे सगळंच टिळकांना अभ्यास करून मांडावं लागलं. मोदींना ते सगळं आयतं मिळालेलं आहे. म्हणून टिळकांकडे 'कार्यक्रम' होता, मोदींकडे 'घोषणा' आहेत. पण घोषणा म्हणजे राष्ट्रवादी मांडणी नव्हे. घोषणा म्हणजे पराकोटीची देशभक्ती झाली. उदाहरणार्थ, 'भारताला पहिल्या तीन नंबरमध्ये आणू.' पण कुठले पहिले तीन नंबर? तुम्ही साक्षरता हा



CamScanner

विषय घेतला तर साक्षरता नसलेल्या लोकांच्या बाबतीत भारताचा पहिला नंबर येईल! लोकसंख्येच्या बाबतीत तर पहिला नंबर आहेच. त्यामुळे 'पाच ट्रिलिअनची अर्थव्यवस्था करून दाखवू', 'पहिल्या तीन नंबरमध्ये आणू' या नुसत्या मोठमोठ्या घोषणा म्हणजे राष्ट्रवाद नाही.

**प्रश्न** – मुळात राष्ट्रवाद म्हणजे काय? आणि आपण उल्लेख केला त्याप्रमाणे टिळकांनी तो कसा मांडला आणि त्याचा आतापर्यंतचा प्रवास कसा झाला?

– टिळकांच्या तरुणपणी दोन प्रवाह होते. ''इथे राष्ट्र नाहीच. हा अस्ताव्यस्त पडलेला समाज आहे,'' हे इंग्रजांचं म्हणणं होतं. अठराव्या शतकातील अंधाधुंदीचा फायदा उचलत इंग्रजांनी इथे बस्तान बसवलं. अठराव्या शतकामध्ये, जगात ज्यांच्याकडे सैन्यं होती ते सगळे ती सैन्यं घेऊन भारतात लढत होते. जगातली सगळी सैन्यं इथल्या संस्थानिकांनी भारतात वापरली होती. त्यात युरोपिअन युरोपिअनांशी लढत होते, भारतीय भारतीयांशी लढत होते, हिंदू हिंदूंशी लढत होते, मुसलमान मुसलमानांशी लढत होते. आणि सर्वसामान्य माणसाच्या जीवित-वित्ताची हमी उरलेलीच नव्हती. याच्यामध्ये 'कायद्याचं राज्य' ही संकल्पना घेऊन इंग्रज आले. 'ईस्ट इंडिया कंपनी'ला आपण एक श्रेय दिलं पाहिजे. सैनिक लढाईतून पळून गेला तर त्याला शासन करण्याची पद्धत पूर्वी भारतात नव्हती. मराठ्यांच्या फौजांबद्दल म्हणतात की, लढायला लागले आणि मुंडकं उडालं तरी धडं लढत राहतील, मात्र पळायला लागले आणि झाडाला बांधून घातले तर झाडासकट पळतील. हे काय होतं? ऐन प्रसंगी पळ काढणं याला आपल्याकडे शिक्षाच नव्हती. ती पहिल्यांदा ईस्ट इंडिया कंपनीने आणली. असे जे कोणी 'भगौडे' असायचे त्यांना ते नंतर धरून आणायचे आणि सबंध बटालियनसमोर फाशी द्यायचे. ही शिस्त सैन्याला त्यांनी लावली. म्हणून त्यांचं म्हणणं असं होतं की, तुमच्यावर उपकार म्हणून आम्ही इथे राहत आहोत. आणि 'हे ईश्वरी वरदान आहे, इंग्रज खरोखरच उपकार करत आहेत, त्यांच्याकडून आपण शिकलं पाहिजे, किमान २०० वर्षं यांनी आपल्यावर राज्य केल्यावर आपण शहाणे होऊ,' असं मानणारा एक पक्ष होता. या पक्षाला नाकारणारी जी माणसं होती त्यांतल्या महाराष्ट्रीयांमध्ये प्रामुख्याने टिळक होते. त्यांचं म्हणणं असं होतं की, 'इथे राष्ट्र आहे, आमच्या परंपरा आहेत, आमचा समाज आहे, त्याचं स्वतःचं स्ट्रक्चर आहे, त्याच्या स्वतःच्या व्यापार नियंत्रण करणाऱ्या व्यवस्था आहेत; त्यात सुधारणा करणं आवश्यक असलं तरी त्या इंग्रजांनी करू नयेत, त्या आमच्या आम्ही करू; आणि त्याकरता आम्हांला आधी स्वराज्य पाहिजे. आमच्या समाजाचे प्रश्न आम्हांला सोडवू द्या आणि आम्ही ते सोडवू, आमच्याकडे ज्ञानाची परंपरा फार मोठी आहे.' हे सगळं घेऊन उभा राहणारा पहिला माणूस टिळक होता. त्यांनी इंग्रजांची दुसरी एक महत्त्वाची गोष्ट स्वीकारली. भारतामध्ये त्याआधी जनतेपर्यंत पोहोचायचं तर काही माध्यमच नव्हतं. टिळकांनी वर्तमानपत्राचा मार्ग स्वीकारला. कायद्याचा अभ्यास करून ब्रिटिशांना त्यांच्याच कायद्याच्या आधारे निरुत्तर करणं हा तिसरा मार्ग स्वीकारला. चौथा मार्ग म्हणजे गणेशोत्सव, शिवजयंतीसारखे सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर

देशभक्तीला भावना लागते, बुद्धी लागत नाही. सध्या आपल्या दुर्दैव असं आहे की, आपण बुद्धीने कमी पण भावनेने मोठे अशा देशभक्तांच्या तावडीत सापडलो आहोत. कितीही हृदयापासून येत असली तरी देशभक्ती ही भावना आहे. राष्ट्रवाद हा वैचारिक मांडणीचा विषय आहे. त्याला अभ्यासाशिवाय पर्याय नाही. अभ्यासू माणसाला तुच्छ लेखून तुम्हाला राष्ट्रवाद मांडता येणार नाही. 'माय कंट्री राइट ऑर राँग' अशी राष्ट्रवादाची व्याख्या सांगितली जाते. पण हे वाक्य अर्धे आहे. मूळ विधान असं आहे, 'माय कंट्री राइट ऑर राँग, इफ राइट टू कीप इट राइट अँड इफ राँग टू सेट इट राइट.' देश बरोबर असेल तर मी त्याला त्या मार्गावर ठेवीन आणि देशाचं काही चुकत असेल तर त्याला मार्गावर परत आणीन, हा जो राष्ट्रवादाचा दृष्टिकोन आहे, त्याच्यासाठी अभ्यास लागेल.



CS CamScanner

सुरू केले. पाचवा मार्ग, शिक्षणसंस्था काढणे हा वापरला. सहावा मार्ग म्हणजे निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये संशोधन करणं आणि संशोधन करणाऱ्यांचा, विद्वत्तेचा- अर्थात वादविवाद करून- आदर राखणं. शिक्षणाला प्राधान्य, आधुनिक माध्यमाचा स्वीकार, आधुनिक कायदेपद्धतीचा स्वीकार, वर्तमानपत्र स्थापन करणं, त्यातून ब्रिटिश ॲडमिनिस्ट्रेशनवरती लक्ष ठेवणं हे सगळं टिळकांनी अवलंबलं. 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे', 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय' हे अग्रलेख मुख्यतः ब्रिटिश ॲडमिनिस्ट्रेशनबद्दल लिहिले होते. विसाव्या शतकाचा अंदाज घेऊन एकोणिसाव्या शतकामध्ये टिळकांनी राष्ट्रवादी मांडणी केली. या प्रत्येक बाबतीत त्यांचं म्हणणं असं होतं की, आमची मुळात जी भूमिका असेल, आमच्या परंपरेने आम्हांला काय दिलं असेल ते घेऊन आम्ही पुढे जाऊ. आवश्यक तिथे सुधारणा करू, त्याही आमच्या आम्हीच करू. त्यामुळे असा जर राष्ट्रवादाचा विचार केला तर मोदींना जवळजवळ मार्क मिळणारच नाहीत. कारण मोदी किंवा इंदिरा गांधी यांना लोकप्रियता असली तरी त्यांचा अभ्यास कशाचाच नाही आणि नव्हता. त्यामुळे सगळे खुशमस्करे इंदिरा गांधींच्या भोवती गोळा झाले आणि आता मोदींच्याही भोवती गोळा झालेले आपण बघतो आहोत.

**प्रश्न** – पूर्वीच्या काळी राजकारण आणि वैचारिक मांडणी या दोन्ही गोष्टी एकच व्यक्ती म्हणजे, राजकारणी करत असे. ज्या दोन नावांचा तुम्ही उल्लेख केला ते उत्तम राजकारणी आहेत हे त्यांच्या यशातून, लोकमान्यतेतून, लोकप्रियतेतून दिसतंच. पण सध्याच्या राजकारण्यांकडून वैचारिक मांडणी होताना दिसत नाही. सध्याच्या काळामध्ये राजकारण आणि वैचारिक मांडणी यांचा एकमेकांपासूनचा संबंध पूर्णतः संपला आहे का?

– राजकारण वेगळं असतं आणि वैचारिक मांडणी वेगळी असते हाच मुळात एक भ्रम आहे. बारकाईने पाहिलं तर असं दिसेल की, कुठल्या काळात कुठले विचार मांडले जातात याच्या मागे प्रकट राजकारण नसेल, पण त्या विचारांची एक राजकीय भूमिका असते, राजकीय आवश्यकता असते. त्यामुळे ते विचार त्या काळात मांडले जातात. उदाहरणार्थ, फ्रान्समध्ये एकाधिकारशाही, हुकूमशाही, जुलूमशाही यांचा अतिरेक झाला तेव्हा १८व्या शतकामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्यं मांडणारे विचारवंत पुढे आले. त्यामुळे आता ही जी फारकत झालेली दिसते, ती कृत्रिम आहे. अभ्यास वेगळा, नोकरी वेगळी किंवा राजकारण वेगळं, वैयक्तिक मतं वेगळी ही चापलुसी आहे. एखादा राजकारणी वचावचा बोलतो, मग त्याच्या पक्षामध्ये प्रश्न निर्माण होतो, मग पक्षाध्यक्ष स्टेटमेंट देतात की, 'ते त्यांचं वैयक्तिक मत असेल ते पक्षाचं मत नाही.' आपण पारतंत्र्यामध्ये होतो तेव्हा हा प्रकारच नव्हता. कारण विचार केल्याशिवाय राजकारण करताच येत नव्हतं. त्या काळात राजकारण करायचं तर, 'आपण पारतंत्र्यात का गेलो' हे तर समजून घ्यावं लागे. त्यासाठी अभ्यास करावा लागे. 'दैवयोगाने गेलो, कलियुगामध्ये लाल तोंडाची माकडं आपल्यावर राज्य करणारच होती,' या पुराणातल्या भाकडकथांचा काही उपयोग नव्हता. म्हणजे पहिला अभ्यास 'स्वातंत्र्य का गमावलं?' याच्या कारणांचा आला. दुसरा अभ्यास 'राज्य करणारे कोण आहेत? त्यांची काय संस्कृती आहे? मूठभर माणसं खंडप्राय देशामध्ये शंभर वर्षांत एवढी पकड का बसवू शकली?' याचा करणं आलं. आणि हे अव्वल इंग्रजीत चालू होतं. अव्वल इंग्रजी म्हणजे १८१८पासून १८५०पर्यंत. त्या वेळी लॉर्ड वेल्सलीने संस्थानं धडाधडा खालसा केली नसती, तर कदाचित १८५७चा उठावही झाला नसता. त्याला मी इंग्रज राज्यकर्ते आणि भारतीय इंटलेक्च्युअल्स यांच्या 'हनिमूनचा पिरियड' म्हणतो. १८४२ किंवा ४३मध्ये ब्रिटिश पार्लमेंटमध्ये एका ब्रिटिश मेंबर ऑफ पार्लमेंटने सांगितलं आहे की, हिंदुस्थानला सुसंस्कृत करण्याची भाषा आपण करू नये. संस्कृतीच जर आयात करायची असेल तर हिंदुस्थानकडून आपल्याला जास्त आयात करावी लागेल. तो प्राचीन आणि समृद्ध देश टिकून राहिला आहे तो काही तिथे जंगली लोक राहत होते म्हणून नव्हे! हा जो सगळा प्रकार चालू होता, त्याचा अभ्यास करावा लागणार होता. याच्यात संघर्षाच्या शक्यता कुठे आहेत, या सत्तेला कुठे अडवता येईल याचाही विचार करणं भाग होतं. त्यामुळे अभ्यासाशिवाय राजकारणात येणंच शक्य नव्हतं. हा पहिला मुद्दा.

दुसरा मुद्दा असा की, टिळकांच्या काळामध्ये 'इलेक्टिव्ह मेरिट' आजच्यापेक्षा फार वेगळं होतं.



CamScanner

अभ्यास तर तुम्ही केला, आता तुम्हांला तो मांडण्याची शैली पाहिजे. वाणी आणि लेखणी या दोन्ही अंगांनी भाषा अवगत पाहिजे. हाताशी वर्तमानपत्र पाहिजे. हे सगळं शिकणं आलं.

तिसरा महत्त्वाचा मुद्दा, तुम्ही किती जोखीम पत्करायला तयार आहात? सरकारला विरोध केला की तुम्हांला तुरुंगवास स्वीकारायला लागेल आणि आयुष्यातल्या इतर सगळ्या विकासाच्या शक्यता कदाचित कमी होतील. त्यासाठी तुम्ही तयार आहात का? तर तुम्ही राजकारण करू शकत होता. हा गुण अभ्यासातून येत नाही, तर स्वभावाचा असतो. 'देशभक्ताचा एक पाय तुरुंगाच्या दारात' ही म्हण त्या काळी का आली? तर कुठल्याही क्षणी याच्यावर सरकारी अवकृपा होऊ शकते. त्या काळी राजकारणामध्ये जायचं म्हणजे ही तयारी ठेवावी लागत होती. ती पहिल्यांदा दाखवली टिळकांनी. टिळक आणि इतर देशभक्त यांच्यात फरक काय? तर टिळक जोखीम पत्करायला तयार होते. पहिल्या खटल्यातच त्यांना आणि आगरकरांना तीन महिन्यांची शिक्षा झाली. ती त्यांनी भोगली. त्यांच्या आणि आगरकरांच्या मैत्रीचा

शंभर वर्षांपूर्वी मद्रासहून एक पुस्तक निघालं होतं 'ऑल अबाउट लोकमान्य टिळक.' जोसेफ बॅप्टिस्टा यांची प्रस्तावना त्याला आहे. बॅप्टिस्टाने टिळकांना त्या प्रस्तावनेमध्ये 'अवर व्हेनरेबल गुरू' म्हटलं आहे. ही टिळकांची इमेज आहे! 'रामस्वामी शास्त्रुलु अँड सन्स' या १५० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेलं हे आठशे पानांचं पुस्तक आहे. त्याच्यामध्ये टिळकांचं त्या वेळी उपलब्ध असलेलं अल्प चरित्र आहे, देशभरच्या वर्तमानपत्रांमधून टिळकांवर आलेले लेख आहेत. त्यामध्ये मराठीतलं काहीही नाही. याशिवाय इंग्लंडमधल्या वर्तमानपत्रांनी घेतलेली नोंद, टिळकांची वैचारिक मांडणी, त्यावर झालेले वादविवाद असं सगळं आहे. टिळक गेल्यानंतर दोन-एक वर्षांनी म्हणजे १९२२-२३मध्ये हे पुस्तक आलं आहे. ही टिळकांची इमेज त्यांनी स्वतः कमावलेली आहे!

मंडाले तुरुंगात लोकमान्य टिळक, १९१४





CamScanner

आणि भांडणाचा पायाही तिथे घातला गेला. पाठोपाठ त्यांना १९व्या शतकाच्या दशकात शेवटच्या दीड वर्षाची सक्तमजुरी झाली आणि गलितगात्र होऊन वर्षभरात ते बाहेर आले. प्रकृती इतकी खालावली की सरकारने त्यांना सोडलं. पण टिळक त्यांचं काम सोडणार नव्हते. हे धैर्य त्या वेळेला भारतात जवळपास कोणाकडेच नव्हतं. दीड वर्षाची सक्त मजुरी भोगल्यानंतर टिळक पुण्याचे पुढारी राहिले नाहीत, टिळक महाराष्ट्राचे पुढारी राहिले नाहीत, ते एकदम राष्ट्रीय पुढारी झाले. अशा प्रकारचा धोका पत्करून निभावणारा आणि हातात घेतलेलं काम न सोडणारा हा पहिला पुढारी आहे. सुरत काँग्रेसपासून त्यांनी 'मास पॉलिटिक्स' स्वतःच्या बाजूने वळवलं. पण त्यानंतर त्यांना तीनच वर्षं मिळाली आणि पुन्हा ते सहा वर्षं तुरुंगात अडकले. पण १९१४मध्ये टिळक बाहेर आले तेव्हा ते दैवत बनून आले होते.

महाराष्ट्राला हे पुस्तक माहीत नसतं म्हणून मी मुद्दाम त्याचा उल्लेख करतो. शंभर वर्षांपूर्वी मद्रासहून एक पुस्तक निघालं होतं 'ऑल अबाउट लोकमान्य टिळक.' जोसेफ बॅप्टिस्टा यांची प्रस्तावना त्याला आहे. बॅप्टिस्टाने टिळकांना त्या प्रस्तावनेमध्ये 'अवर व्हेनरेबल गुरू' म्हटलं आहे. ही टिळकांची इमेज आहे! 'रामस्वामी शास्त्रुलु अँड सन्स' या १५० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेलं हे आठशे पानांचं पुस्तक आहे. त्याच्यामध्ये टिळकांचं त्या वेळी उपलब्ध असलेलं अल्प चरित्र आहे, देशभरच्या वर्तमानपत्रांमधून टिळकांवर आलेले लेख आहेत. त्यामध्ये मराठीतलं काहीही नाही. याशिवाय इंग्लंडमधल्या वर्तमानपत्रांनी घेतलेली नोंद, टिळकांची वैचारिक मांडणी, त्यावर झालेले वादविवाद असं सगळं आहे. टिळक गेल्यानंतर दोन-एक वर्षांनी म्हणजे १९२२-२३मध्ये हे पुस्तक आलं आहे. ही टिळकांची इमेज त्यांनी स्वतः कमावलेली आहे!

१९१४मध्ये टिळक मंडालेला अडकले. तिथे एकही क्षण त्यांनी वाया घालवला नाही. लगेच ते अभ्यासाला लागले आणि 'गीतारहस्य'सारखं पुस्तक त्यांनी लिहिलं. इकडे टिळकांच्या अनुपस्थितीत काँग्रेसचे प्रतिनिधी घटायला लागले होते. १९१३मध्ये झालेल्या काँग्रेस अधिवेशनामध्ये सव्वादोनशे प्रतिनिधी हजर होते. १९१४-१५मध्ये टिळक आले तेव्हा पुन्हा एकदा अडीच हजार प्रतिनिधी काँग्रेस अधिवेशनाला आलेले होते. हे टिळकांचं मोठेपण त्यांचं 'पॉलिटिकल मेरिट' काय होतं ते दाखवतं.

आता अशी परिस्थिती आहे की, अभ्यास नसला तरी चालेल किंवा नसलेला बरा. थातूरमातूर बोलता आलेलं चांगलं. उदाहरणार्थ, "शिवाजी महाराजांनी पहिला सर्जिकल स्ट्राइक केला," असं शरद पवार या पुरस्काराच्या कार्यक्रमामध्ये म्हणाले. वास्तविक 'सर्जिकल स्ट्राइक' हा शत्रूच्या प्रदेशात जाऊन करायचा असतो! पण पवारांकडून अभ्यासाची अपेक्षा त्यांचा मोठा चाहतासुद्धा ठेवणार नाही, कारण त्यांना वेळच कुठे आहे अभ्यास करायला? म्हणजे राजकारण्यांचा अभ्यासाशी संबंध राहिला नाही. दुसरा भाग इमेजचा. ती चांगली असली तरी चालते आणि वाईट असली तरी चालते. तुरुंगातून माणसं निवडून येतात! हा काय भयानक प्रकार आहे. म्हणजे राजकारणामध्ये यायचं असेल तर 'येनकेनप्रकारेण' निवडून येता आलं पाहिजे! हे टिळकांच्या काळातही होतं की, तुम्हांला स्वबळावर निवडून यावं लागेल; तुमचं कुटुंब, तुमची एखादी संस्था असेल तर ती, याचा भार स्वीकारावा लागेल, तो समाज स्वीकारेलच असं नाही आणि त्याहीपेक्षा तुमच्यावर ज्या कायदेशीर कारवाया होतील, खटले होतील त्याचा खर्च सुरुवातीच्या काळात तरी तुम्हीच केला पाहिजे. आताही हे तसंच आहे. पण त्याचा अर्थ फार वेगळा आहे! आता तुमचे (काळे/पांढरे) पैसे घेऊन तुम्ही राजकारणात आलं पाहिजे. मग तुम्ही निर्भय नसलात तरी चालेल. पण तुम्हांला कुठल्याही क्षणी विधिनिषेध बाजूला ठेवता आला पाहिजे. 'कालपर्यंत मी या पक्षात होतो, आज त्या पक्षात कसा जाऊ?' असा विचार करून चालणार नाही. माझ्या मते, निदान आचारसंहिता लागू झाल्यानंतर पक्षांतरबंदी केल्याशिवाय हा राजकारणाचा पोरखेळ दुरुस्त करता येणार नाही. इलेक्टिव्ह मेरिट आता पूर्णपणे बदललेलं आहे. किंबहुना मेरिट राहिलेलंच नाही. जे टिळकांच्या काळात 'डीमेरिट' होतं तेच जर आता मेरिट ठरलं असेल तर त्या वेळेला स्वकर्तृत्वाने राष्ट्रीय नेते बनलेले टिळक आणि आताचे राष्ट्रीय नेते यांची तुलना कशी करणार आपण?

**प्रश्न –** टिळकांचं राजकारण आणि मोदींचं राजकारण यांचा विचार करत असताना एक मुद्दा असा



CamScanner

लक्षात येतो की, पूर्ण देशावरती ज्यांचा प्रभाव आहे असे नेते उत्तरेतून, 'गँजेटिक' प्लेनमधून येतात असं म्हटलं जातं. टिळक मात्र पुण्यातून सगळ्या देशाचे नेते झाले. आता दोनदा निवडणूक जिंकलेले नरेंद्र मोदी हे गुजरातेतून आले. नॉन गँजेटिक प्लेनमधून देशाचा नेता बनणं याच्याकडे तुम्ही कसं बघता?

– महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांचं भारताच्या नकाशामधलं स्थान गमतीदार आहे. त्यांना 'उत्तर-दक्षिण' या विभाजनात न धरता खरं म्हणजे 'पश्चिम प्रांत' म्हणायला पाहिजे. आणि ते उत्तर व दक्षिण यांच्या सीमारेषेवर आहेत. आपल्या पुराणांमध्येसुद्धा नर्मदा ही सांस्कृतिक सीमा मानलेली आहे. 'रेवाया: उत्तरे तीरे' आणि 'रेवाया: दक्षिणे तीरे'अशी त्या वेळी मांडणी केली जायची. त्यामुळे नर्मदेच्या खालच्या प्रदेशाला 'दक्षिणापथ' म्हणत असत. कारण नर्मदा ही आपल्या देशातली सर्वांत प्राचीन नदी आहे आणि विंध्य हा सर्वांत प्राचीन पर्वत आहे. गुजरात आणि महाराष्ट्र या दोघांना नर्मदेचा स्पर्श होतो त्यामुळे ते 'कस्प'मध्ये आहेत. त्यांच्यामध्ये उत्तरेचाही काही भाग आहे दक्षिणेचाही काही भाग आहे. महाराष्ट्राला जर तुम्ही दक्षिणेत ढकलायला गेलात तर कर्नाटक आणि आंध्रशी फटकून राहणं हे महाराष्ट्रात फार जुनं आहे. 'कानडदेशा तेलंगदेशा न वसावे, महाराष्ट्री वसावे' हे महानुभाव अकराव्या शतकापासून सांगत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राला दक्षिणेकडेही ढकलता येत नाही आणि उत्तरेकडेही. टिळक स्वगुणावरती देशाचे नेते झाले पण त्यांना हिंदी येत नव्हतं. बहुधा न. र. फाटकांच्या टिळक चरित्रात असा उल्लेख आहे की, टिळक मंडालेहून परत आल्यानंतर सगळ्या देशभर मिरवणुका निघायला लागल्या. जिथे अधिवेशन असेल तिथे मुख्य काम टिळकांची मिरवणूक. असा एक देशभक्त- जो उतार वयात असतानाही सहा वर्षं तुरुंगात राहिला, परत आला तोही एक महान पुस्तक लिहून आला- लोकांनी याआधी पाहिलाच नव्हता. टिळकांचं दैवतीकरण सुरू झालं. बायका आपली आजारी मुलं टिळकांच्या पायांवर घालायला लागल्या. टिळकांना दोन गोष्टींची सवय नव्हती. फक्त स्त्रियांच्या समोर असं ते कधी बोललेले नव्हते. (हा टिळक आणि गांधींमधला मुख्य फरक आहे. टिळक हे गांधींपेक्षा जास्त कर्मठ वातावरणात वाढल्यामुळे स्त्रियांशी मोकळेपणाने बोलणं टिळकांना आयुष्यभर जमलं नाही.) आणि फाटकांनी असा उल्लेख केला आहे की, उत्तर भारतामध्ये आपल्याला लोक एवढे मानतात म्हणून टिळकांनी हिंदी बोलण्याचा सराव सुरू केलेला होता. असा तो सगळा त्या वेळेचा माहोल आहे. त्यामुळे आपण म्हणतो आहे त्याप्रमाणे टिळकांची उत्तर हिंदुस्थानात जी इमेज होती ती हिंदी भाषा येत नसताना होती, हे मुख्य लक्षात घेतलं पाहिजे. मोदी उत्तर हिंदुस्तानाशी चटकन कनेक्ट करू शकतात कारण त्यांची मातृभाषा हिंदी आहे. ते गुजरातचे असले आणि गुजराती उत्तम बोलत असले तरी मूळचे राजस्थानी आहेत. दक्षिण भारतामध्येही टिळक लोकप्रिय होते. याआधी ज्याचा उल्लेख केला ते पुस्तक तर मद्रासहून आलं. याचं कारण टिळकांचं इंग्लिश अतिशय चांगलं होतं, जे मोदींचं नाही. गरजेप्रमाणे ते थोडेफार बोलत असतील परंतु इंग्लिशवर त्यांचं प्रभुत्व नाही. पण हिंदीवर मात्र आहे. आणि आपल्या भारतीयांची जी सातवी-आठवी लेव्हलची देशप्रेमाची, देशभक्तीची भाषा असते तिला धरून ते कायम बोलत राहतात. तशा कोट्या-विनोद करत राहतात. उदाहरणार्थ, 'मिशन ऑन मार्स'चा त्यांनी शॉर्टफॉर्म केला 'मॉम'. आणि म्हणाले, 'मंगल को मां मिल गई!' मंगळ आणि पृथ्वी हे एकाच सूर्यामधून आलेले आहेत, त्यांच्यामध्ये आई आणि मुलाचं नातं तुम्ही कसं लावता? पण पंतप्रधानाला सगळं माफ असतं ना! भर्तृहरी म्हणाला, ''सर्वे गुणाः कांचनम् आश्रयन्ते'' तसं लोकशाही म्हणते की, निवडून आलेल्याला सगळं माफ असतं. 'सर्वे गुणाः पॉवरम् आश्रयन्ते' असं मी त्याचं सुलभीकरण करतो. अवकाशयानाची गडबड झाली त्या वेळेला अमेरिका किंवा रशिया असती तर निदान २५ माणसांची मुंडकी उडाली असती. (हे मी लाक्षणिक अर्थाने म्हणतो आहे.) तर मोदींनी कोटी केली. 'संपर्क टूट गया लेकिन संकल्प कायम रहेगा!' संघ शाखेवरच्या कोट्या आहेत या.

उत्तर हिंदुस्तानातल्या मोदींच्या लोकप्रियतेमागे अभ्यासही नाही आणि आणि भविष्याचा काही विचारही नाही, घोषणा आहेत! २०१४पासून तुम्ही यादी काढलीत तर निदान ३०-४० आकर्षक घोषणा मोदींच्या नावावर जमा करता येतील. मागच्या घोषणेचं काय झालं याचा विचार करायला लोक लागतात तोवर हे नवीन घोषणा



CamScanner



लोकमान्य टिळक : केसरीवाडा, इ.स. १९००

घेऊन येतात. याला लोकप्रियता म्हणण्यापेक्षा 'क्राउड पुलिंग' म्हटलं पाहिजे. चटपटीत बोललेलं लोकांना आवडतं. तसं बोलण्यामध्ये मोदी पटाईत आहेत. तसं टिळकांना बोलता येत नव्हतं, हे या देशाचं फार मोठं भाग्य आहे. टिळकांनी अशा फालतू कोट्या कधी केलेल्या नाहीत. टिळक म्हणजे रोखठोक. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' या प्रेरणेमधून टिळक आलेले होते. त्यामुळे टिळकांची उत्तर भारतातील लोकप्रियता आणि मोदींची उत्तर भारतातील लोकप्रियता या सारख्या नाहीत. आणि मोदींची लोकप्रियता जेवढी आहे तेवढाच आता त्यांचा तिरस्कारही वाढत चाललेला आहे हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. ते टिळकांच्या वाट्याला फक्त महाराष्ट्रात आलं. 'काव्ये कवीची जगतात गावी, त्याचे न त्याच्या परी चोज गावी' अशी टिळकांची परिस्थिती आहे. दुसऱ्या एखाद्या प्रांतात टिळक झाले असते तर लोकांनी अभिमानपूर्वक टिळकांच्या नावाने राजकारण केलं असतं. पण महाराष्ट्रात टिळक प्रतिगामी ठरतात आणि देशभरात ते त्यांच्या काळामध्ये पुरोगामी ठरले याचं कारण नवीन राष्ट्राची मांडणी त्यांच्या डोक्यात होती.

आगरकरांशी झालेल्या भांडणांमधून टिळक खूप शिकले. आता माणूस तोडणारं राजकारण करायचं नाही हे पथ्य त्यांनी पाळलं. हे टिळक आणि लेनिन यांच्यातलं साम्य आहे. लेनिनचा जन्म १८७०मधला आहे. म्हणजे त्या दोघांमध्ये एका पिढीचे अंतर आहे. लेनिनचाही भांडणावर प्रचंड विश्वास होता. त्याने कधीही गुळमुळीत बोलून माणसं जोडली नाहीत. 'कम्युनिस्ट पार्टी'ची मीटिंग व्हायची त्या प्रत्येक वेळी 'लेनिन विरुद्ध इतर' अशी परिस्थिती असायची. टिळक तरुणपणी तसे होते. पण आगरकरांच्या प्रकरणातून ते धडा शिकले. आता माणूस तुटू द्यायचा नाही एवढं त्यांनी नक्की केलं. शाळा आणि कॉलेज काढून काही होत नाही, नुसतं वर्तमानपत्र काढून काही होत नाही हेही त्यांच्या लक्षात आलं. कारण शेवटी ते वाचणारे लोक किती? साक्षरता जेवढी असेल तेवढे. मग थेट समाजाकडे गेलं पाहिजे म्हणून गणेशोत्सव सुरू केला. चातुर्य होतं टिळकांकडे. म्हणून फुले असेपर्यंत त्यांनी हे उत्सव सुरू केले नाहीत, इकडे मी मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो. कारण त्याला फुले यांनी विरोध केला असता. फुले यांचे 'गणपतीचे अभंग' काढून पाहिले तर तुमच्या लक्षात येईल. समाजाकडे जाण्यासाठी वेगळे मार्ग स्वीकारले पाहिजेत हे टिळकांच्या लक्षात आलं.

तुरुंगवासाच्या हालअपेष्टा सोसण्याची तयारी त्यांनी ठेवली होतीच. आणि 'काँग्रेस आता फोडली पाहिजे' म्हणून सुरतला त्यांनी काँग्रेसचं विभाजन केलं आणि 'मास लीडर' म्हणून ते पुढे आले. हे सगळं करत करत १९१९मध्ये टिळकांनी 'काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी' ही कल्पना मांडली. तिचा जो जाहीरनामा त्यांनी लिहिला आहे, तो संपूर्णपणे 'भारतीय राज्यघटनेची पायाभरणीच आहे असं आपल्याला म्हणता येतं. टिळकांनी 'सेक्युलर', 'समाजवादी' असे शब्द वापरलेले नाहीत. परंतु संपूर्णपणे लोकशाही पायावरती हे नवीन राष्ट्र कसं उभारायचं याविषयी त्यांनी त्यात लिहिलेलं आहे. त्यांना थोडा अंदाज आलेला होता की, आपल्या आयुष्य आता



CamScanner

फारसं राहिलेलं नाही. आणि आता हा गांधी नावाचा माणूस आपल्यानंतर देशभर राजकारण करणार आहे. त्यामुळे त्यांनी ते गांधींना दाखवून मान्य करून घेतलेलं होतं. १९१९-२०मध्ये हे झालं; १ ऑगस्ट १९२०ला टिळक गेले आणि गांधींनी ते सगळं गुंडाळून ठेवून राजकारण, तत्त्वज्ञान, आतला आवाज, धर्म, नीतिमत्ता या सगळ्यांचा असा काही गुंता केला की तो अजूनही सोडवता आलेला नाही. मुद्दा असा की, ही टिळकांची राष्ट्रवादाची मूळ 'व्हिजन' होती. 'स्वातंत्र्य' हा शब्द टिळकांनी वापरलेला नाही. 'स्वराज्य' म्हणजे 'फ्रीडम' म्हटलेलं आहे. 'इंडिपेन्डन्स' हा शब्दही त्यांनी वापरला नाही, कारण त्या काळात तो वापरून काही उपयोग नव्हता. आणि 'आयरिश होमरूल चळवळी'च्या धर्तीवरती ते विचार करत होते. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही टिळकांच्या राजकारणाची मूळ चार सूत्रं होती. ती कायम ठेवून त्यांनी 'काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी'चा जाहीरनामा लिहिला. तो पाहायचा असेल तर समग्र टिळक वांङ्मय चाळायची गरज नाही; आपल्या सुदैवाने श्रेष्ठ वैदिक लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी टिळकांच्या निवडक अग्रलेखांच्या संग्रहाचं संपादन करून त्याला प्रस्तावना लिहिली आहे. मराठीतल्या उत्कृष्ट प्रस्तावनांपैकी ती आहे. त्यात आपल्याला त्या जाहीरनाम्याविषयी वाचायला मिळतं. असं लक्षात येतं की, आंबेडकरांनी पुढे १९५०मध्ये जे राज्यघटनेमध्ये आणलं त्यातल्या बहुतेक गोष्टी टिळकांनी त्या जाहीरनाम्यामध्ये आणलेल्या होत्या. त्यात औद्योगिक धोरण आहे, मतदानाच्या अधिकाराचा उल्लेख आहे, स्त्री-पुरुष समानतेचा उल्लेख आहे, कामगार आणि शेतकरी यांच्याविषयी कशा प्रकारची तरतूद असावी याचा उल्लेख आहे, शिक्षणसंस्थांचा उल्लेख आहे, माध्यमांच्या स्वातंत्र्याचा उल्लेख आहे. टिळक राष्ट्रवाद घेऊन पुढे आले. "आमच्या राष्ट्रातील सुधारणा आम्ही निश्चित करू," असं जे इथल्या सुधारकांना आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांना सांगत होते, ते सगळं एकत्र करून टिळकांनी १९१९मध्ये तो जाहीरनामा लिहिलेला होता. आपल्या दुर्दैवाने टिळकांना त्यानंतर पाच वर्षंसुद्धा मिळाली नाहीत. आपले दिवस कमी राहिले आहेत हे टिळकांच्या लक्षात आलं असावं. पण आठवडाभरातच आपण जाऊ याची कल्पना त्यांनाही

बहुधा न. र. फाटकांच्या टिळक चरित्रात असा उल्लेख आहे की, टिळक मंडालेहून परत आल्यानंतर सगळ्या देशभर मिरवणुका निघायला लागल्या. जिथे अधिवेशन असेल तिथे मुख्य काम टिळकांची मिरवणूक. असा एक देशभक्त- जो उतार वयात असतानाही सहा वर्षं तुरुंगात राहिला, परत आला तोही एक महान पुस्तक लिहून आला- लोकांनी याआधी पाहिलाच नव्हता. टिळकांचं दैवतीकरण सुरू झालं. बायका आपली आजारी मुलं टिळकांच्या पायांवर घालायला लागल्या. टिळकांना दोन गोष्टींची सवय नव्हती. फक्त स्त्रियांच्या समोर असं ते कधी बोललेले नव्हते. (हा टिळक आणि गांधींमधला मुख्य फरक आहे. टिळक हे गांधींपेक्षा जास्त कर्मठ वातावरणात वाढल्यामुळे स्त्रियांशी मोकळेपणाने बोलणं टिळकांना आयुष्यभर जमलं नाही.) आणि फाटकांनी असा उल्लेख केला आहे की, उत्तर भारतामध्ये आपल्याला लोक एवढे मानतात म्हणून टिळकांनी हिंदी बोलण्याचा सराव सुरू केलेला होता.

आली होती असं वाटत नाही. जुलैच्या शेवटच्या आठवड्यामध्ये मुंबईला ते आजारी पडले आणि खचत जाऊन एक ऑगस्टला त्यांचं निधन झालं. हे त्यांच्याही हिशेबात नसावं.

अशा राष्ट्रवादाची २१व्या शतकामध्ये वेगळी मांडणी करावी लागेल. २१व्या शतकामध्ये आता बदल काय झालेला आहे? आता आपण स्वतंत्र, सार्वभौम आहोत. आपण जगातली सगळ्यात मोठी लोकशाही आहोत. प्रशिक्षित मनुष्यबळ आपल्याकडे जास्त आहे. ३०-४० कोटींचा ग्राहकवर्ग तयार झाला आहे, त्या ग्राहकवर्गाकडे जगभराच्या कारखानदारांचं, व्यापाऱ्यांचं लक्ष आहे. त्यामुळे G७ असो किंवा काहीही असो, भारतातल्या कुठल्याही पंतप्रधानाला अजून २०-२५ वर्षं तरी काही पदं न मागता मिळणार आहेत. त्यामध्ये त्या व्यक्तीचं फार मोठं कर्तृत्व पाहायला कोणी जाऊ नये. कारण आता



CamScanner

पुन्हा एकदा ही जगाची मोठी बाजारपेठ होणार आहे. पण आता तुम्हाला समाजवादी पद्धतीने अर्थव्यवस्थेचं नियंत्रण करता येणार नाही. उद्योजकांचं आणि उत्पादकांचं स्वातंत्र्य जपावं लागेल. ते जपायचं असेल तर तुमच्या देशातला एक फार मोठा उत्पादक वर्ग अत्यंत वैफल्यग्रस्त आहे, तो म्हणजे शेतकऱ्यांचा वर्ग. त्यांचं वैफल्य दूर करावं लागेल. 'स्वातंत्र्य' हे मूल्य मानायचं असेल तर फार मोठ्या संख्येने आपल्याकडे सामाजिक बाबतीत आणि कौटुंबिक बाबतीतसुद्धा स्त्रिया आणि दलित यांचं स्वातंत्र्य सुरक्षित आहे असं अजूनही आपल्याला म्हणता येत नाही. हे सगळं जमेला धरून राष्ट्रवाद मांडावा लागेल. जागतिकीकरण, उदारीकरण यांचा तिरस्कार करून काही पदरात पडणार नाही. या गोष्टी तुम्ही थांबवू शकत नाही. हे संकट नाही, पण जर तुम्ही त्याला संकट मानत असाल तर त्याचं संधीमध्ये रूपांतर कसं करायचं, ही सगळी मांडणी करणं याला मी आजचा राष्ट्रवाद म्हणतो. काहीतरी करून निवडणुका जिंकणं, स्वतःच्या पक्षाचं सरकार आणणं, इतर सगळ्या पक्षांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करणं हे पूर्वी इंदिरा गांधीही करत होत्याच. "हे लोक मला सरकार चालवू देत नाहीत," असं १९६०-७०च्या दशकामध्ये इंदिरा गांधी म्हणत होत्या, तेच आता मोदी म्हणत आहेत. ही त्यांची राजकीय सोय-गैरसोय आहे. पण लोकांनी लक्षात घ्यायला पाहिजे की, राष्ट्रवादी असणं म्हणजे 'अभिमान असणं, प्रेम असणं' हे आता जुनं झालं. राष्ट्रवादी असणं याचा अर्थ जगातील सगळ्या व्यवस्थांमध्ये आपल्या देशाचं स्थान आणि आपल्या देशाचं उज्ज्वल भविष्य निश्चित करता येणं आणि ते तसं राखता येणं हे आजच्या राष्ट्रवादाच्या मांडणीत असायला हवं.

टिळकांप्रमाणे आपणही म्हणतो की, आपल्या देशाचे अंतर्गत प्रश्न आपण सोडवू. पण आपण ते सोडवत नाही आहोत. गेली कित्येक वर्षं आपण शेतकऱ्यांच्या वैफल्याकडे दुर्लक्ष केलं आहे. समाजाचं प्रबोधन होऊन सामाजिक न्याय प्रस्थापित होईल यासाठीचे प्रयत्न नाहीत. स्त्रिया एकीकडे निर्भय आणि स्वतंत्र होत आहेत तर दुसरीकडे तितक्याच असुरक्षित होत आहेत. वाहतूक व्यवस्था आधुनिक होत आहे आणि समृद्धी महामार्गावर रोज माणसं मरत आहेत. या सगळ्या प्रश्नांचा विचार करून आणि टिळकांच्या राष्ट्रवादातली मूळ प्रेरणा आणि बांधिलकी कायम ठेवून एकविसाव्या शतकासाठी नवीन मांडणी करणं आवश्यक आहे. एकविसाव्या शतकाचीही पहिली २५ वर्षं संपत आली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे', आणि मी तो 'मिळवणार'च या शब्दांमध्ये टिळकांची शंभर टक्के बांधिलकी दिसते, आणि तो 'मला' मिळाला की 'सगळ्यांना'च मिळणार आहे हा आत्मविश्वासही दिसतो. तसंच, २१व्या शतकामध्ये स्वच्छ, समृद्ध जीवन हा प्रत्येक नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मान्य झाला पाहिजे. पण असं केवळ म्हणून तो मान्य होणार नाही. त्याच्यासाठी पंतप्रधानांपासून सगळ्यांनीच सहभाग घेतला पाहिजे. ही जाणीव मला आजच्या काळात तरी कमी दिसते आहे.

**प्रश्न** – टिळक हे मूळ काँग्रेसचे नेते होते. आजच्या काळामध्ये जेव्हा तथाकथित राष्ट्रवाद 'ट्रेंडिंग' आहे. अशा वेळी काँग्रेसने टिळकांची राष्ट्रवादाची भूमिका पुनरुज्जीवित करणं, त्या मार्गाने चालणं काँग्रेसच्या फायद्याचं नाही का? आणि हा राष्ट्रवाद मांडून त्याला सोबत घेणं राजकीय दृष्ट्या फायद्याचं आहे म्हणूनच नरेंद्र मोदी लोकमान्य टिळक पुरस्कार स्वीकारतात का?

– राष्ट्रवादासंबंधी दोन मतप्रवाह आहेत. हिंदू राष्ट्रवाद की हिंदी राष्ट्रवाद? तुम्ही विचारता आहात त्या प्रश्नाच्या मुळाशी ही विभागणी आहे. टिळकांच्या काळातसुद्धा हा प्रश्न होता. त्याला टिळकांचं उत्तर असं होतं की, या देशातले मुसलमान या देशातच राहणार. आणि हिंदू व मुसलमान या दोन समाजांनी परस्पर सामंजस्याने, सहकार्याने आणि अनाक्रमणाचं पथ्य पाळून राहिलं पाहिजे. खास अधिकार कोणालाही नाहीत. कोणी कोणावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करू नये. त्याचं पर्यवसान लखनौच्या करारामध्ये झालेलं दिसतं. त्या अर्थी टिळकांचा 'हिंदी राष्ट्रवाद' होता असं म्हणायला पाहिजे. मुसलमानांना वगळून हिंदूंचं संघटन करावं किंवा वेगळा पक्ष काढावा असं त्यांच्या मनात नव्हतं. म्हणून त्यांनी 'काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी' असं म्हटलं, त्याला इतर काही नाव दिलं नाही. त्या काळात इतर राजकीय पक्ष जेमतेम सुरू झालेले होते. त्यामुळे त्यांना राष्ट्रीय ओळख नव्हती. टिळक जोपर्यंत काँग्रेसमध्ये होते तोपर्यंत त्यांचा जो काही राष्ट्रवाद आहे तोच काँग्रेसचा असणार होता. आता राष्ट्रवादाच्याच



CamScanner

तीन-चार व्याख्या आपल्याला कराव्या लागतात. 'नॅशनॅलिझम विदाउट अ नेशन इन इंडिया' नावाचं एक फार चांगलं पुस्तक आहे. त्यात असं मत मांडलं आहे की, आपण आता जिच्याबद्दल बोलतो आहोत ती जी काही राष्ट्रवादाची मांडणी होती, त्याच्यातून देशातला सगळा बहुजन समाज बाहेरच होता. म्हणजे 'बहुजनांचा राष्ट्रवाद' हा आता वेगळा प्रश्न निर्माण झाला आहे. 'सेक्युलर राष्ट्रवाद' हा दुसरा प्रश्न आलेला आहे. हिंदू राष्ट्रवादाचा खरं म्हणजे पराभव झालेला आहे हे स्पष्ट आहे, पण अजूनही ती भाषा वापरत राहण्याची काही लोकांची सवय जात नाही. या देशांमध्ये हिंदू बहुसंख्येने असले तरीसुद्धा केवळ हिंदूंचं राजकारण करून तुम्हांला हा देश पुढे नेता येणार नाही हे स्पष्ट झालेलं आहे. नव्या राष्ट्रवादाला स्त्री-स्वातंत्र्याचीही किनार येऊ लागली आहे.

मुळात राष्ट्रवाद हा अभ्यासातूनच निश्चित केला पाहिजे. त्याऐवजी परस्परांच्या राष्ट्रवादाला नकार द्यायचा अशीच मांडणी आता केली जाते. डावे पक्ष म्हणतात, ''उजव्या पक्षांचा राष्ट्रवाद आमचा नाही''; उजवे पक्ष म्हणतात, ''स्युडो सेक्युलर राष्ट्रवाद आमचा नाही''; बहुजन समाजवादी पक्ष म्हणणार, ''उच्च वर्णीयांचा राष्ट्रवाद आमचा नाही''; कम्युनिस्ट म्हणणार, ''भांडवलदारधार्जिणा राष्ट्रवाद आमचा नाही.'' या सगळ्याचा एक अस्वस्थ करणारा अर्थ असा आहे की, अजूनही आपण 'राष्ट्रसंकल्पना' पूर्णपणे निश्चित करू शकलेलो नाही. ती करावी लागेल आणि सगळ्या समाजघटकांचा विचार करून नवीन राष्ट्रवादाची मांडणी आपल्याला करावी लागेल. काँग्रेसचा राष्ट्रवाद, भाजपचा राष्ट्रवाद हे तात्कालिक वापरायचे शब्द आहेत. मुळात प्रश्न असा आहे की, तुम्हांला या देशातलं मानवी जीवनातलं धर्माचं स्थान निश्चित करावं लागेल. ते जोपर्यंत तुम्ही निश्चित करत नाही तोपर्यंत 'हिंदू' की 'हिंदी' हा प्रश्न मिटत नाही. या देशातल्या आर्थिक असमानतेचं काय करायचं याचा निर्णय घ्यावा लागेल. 'सब का साथ सब का विकास' हे थोतांड आहे. इथली आर्थिक दरी कमी करावीच लागेल. ते एकदा निश्चित झालं की, हा भांडवलदारांचा राष्ट्रवाद आहे की श्रमिकांचा राष्ट्रवाद आहे ही चर्चा राहणारच नाही. अजूनही सगळ्यात जास्त रोजगार शेतीमध्येच आहे. त्यामुळे त्या क्षेत्राची आर्थिक प्रतिष्ठा राखली गेली पाहिजे. शेतकऱ्याला 'लाखाचा पोशिंदा' म्हणून त्याचा गौरव करणं या धूळफेकीला आता कोणी फसणार नाही. त्याला तुम्ही अर्थव्यवस्थेचा घटक मानता की मानत नाही? मानत असाल तर त्याच्या संबंधी तुम्हांला वेगळी तरतूद करावी लागेल. स्त्री-स्वातंत्र्याबरोबरच स्त्रीच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची आहे हे निश्चित करावं लागेल. आपण इतक्या झपाट्याने आधुनिक व्यवस्था स्वीकारत चाललेले आहोत, पण तशी मानसिकता तयार होत नाही. उदाहरणार्थ, समृद्धी महामार्गावर ज्या वेगाने वाहनं चालवायची मुभा आहे त्या वेगाने वाहनं चालवायला वेगळे चालक लागतील. आधुनिक शिक्षण घेतलेली माणसं त्या क्षेत्रामध्ये यावी लागतील. त्या वेळी हे अपघात कमी होतील. आता संपर्काचं तंत्रज्ञान सगळ्यांना उपलब्ध झालं आहे. पण लोक

मुळात राष्ट्रवाद हा अभ्यासातूनच निश्चित केला पाहिजे. त्याऐवजी परस्परांच्या राष्ट्रवादाला नकार द्यायचा अशीच मांडणी आता केली जाते. डावे पक्ष म्हणतात, ''उजव्या पक्षांचा राष्ट्रवाद आमचा नाही''; उजवे पक्ष म्हणतात, ''स्युडो सेक्युलर राष्ट्रवाद आमचा नाही''; बहुजन समाजवादी पक्ष म्हणणार, ''उच्च वर्णीयांचा राष्ट्रवाद आमचा नाही''; कम्युनिस्ट म्हणणार, ''भांडवलदारधार्जिणा राष्ट्रवाद आमचा नाही.'' या सगळ्याचा एक अस्वस्थ करणारा अर्थ असा आहे की, अजूनही आपण 'राष्ट्रसंकल्पना' पूर्णपणे निश्चित करू शकलेलो नाही. ती करावी लागेल आणि सगळ्या समाजघटकांचा विचार करून नवीन राष्ट्रवादाची मांडणी आपल्याला करावी लागेल. काँग्रेसचा राष्ट्रवाद, भाजपचा राष्ट्रवाद हे तात्कालिक वापरायचे शब्द आहेत. मुळात प्रश्न असा आहे की, तुम्हांला या देशातलं मानवी जीवनातलं धर्माचं स्थान निश्चित करावं लागेल. ते जोपर्यंत तुम्ही निश्चित करत नाही तोपर्यंत 'हिंदू' की 'हिंदी' हा प्रश्न मिटत नाही.



CamScanner

सत्यनारायणाचे व्हिडिओ करून एकमेकाला पाठवतात. याचा अर्थ आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारलं, पण आधुनिक मानसिकता आपण स्वीकारलेली नाही.

**प्रश्न** – आताच्या राष्ट्रवादाचा विचार करताना मधल्या काळात राष्ट्रवादाच्या ज्या वेगवेगळ्या परंपरा निर्माण झाल्या – त्याच्यामध्ये एक संघ परिवाराचा असेल, सावरकरांचा असेल, गांधींनी मांडलेला एक वेगळ्या प्रकारचा राष्ट्रवाद असेल – या सगळ्या परंपरा आता नेमक्या कुठे आहेत? त्यांचं काळाच्या ओघामध्ये नेमकं काय झालं?

– गांधी राष्ट्रवादी होते असं मला वाटत नाही. सावरकरांनीसुद्धा राष्ट्राच्या भविष्याची मांडणी करताना सगळ्यात जास्त महत्त्व त्याच्या स्वसंरक्षण क्षमतेला दिलं; इतर गोष्टींची मांडणी सावरकरांनी केलेली नाही. त्यामुळे या सगळ्यांचे राष्ट्रवाद वगैरे नाहीत. या सगळ्यांचे आपापले विचार आहेत. पारतंत्र्याच्या काळात हे विचार घेऊन ते समाजापुढे आले, त्या वेळी त्यांना राष्ट्रवादी म्हणणंच भाग होतं. मी ज्या अर्थाने राष्ट्रवाद म्हणतो आहे, त्या अर्थाने हे राष्ट्रवादी मांडणी करत होते असं मला वाटत नाही. हेच आपल्याला कम्युनिस्टांच्या बाबतीतही म्हणता येईल. टिळकांच्या नंतर एकदम स्टेशन लागतं ते लोहियांचं. समाजवादी अर्थव्यवस्था स्वीकारून, त्यातलं सरकारचं प्राथम्य स्वीकारून पण भारतीय संस्कृतीशी सुसंगत समाजवाद कसा असू शकतो अशा प्रकारची काही मांडणी लोहियांनी केलेली होती. टिळकांच्या नंतर राष्ट्रवादाची मांडणी करणारा म्हणून मी तरी लोहियांकडेच पाहतो. नेहरू राष्ट्रवादी होते, पण त्याहीपेक्षा जास्त प्रमाणात ते आंतरराष्ट्रवादी होते. या विषयावर पुष्कळ बोलता येईल. पण त्यांच्या नंतरच्या पंतप्रधानांपैकी कोणीच राष्ट्रवादाची स्वतंत्र मांडणी केली आहे असं आपल्याला दिसत नाही. त्यामुळे मुळापाशी जाऊनच हे करायला लागेल. कुठल्याही देशभक्ताच्या विचारालाच त्याचा राष्ट्रवाद म्हणणं हे थांबवण्याचीही आपल्याला गरज आहे.

**प्रश्न** – मुलाखतीच्या सुरुवातीला तुम्ही उल्लेख केला की, देशभक्ती आणि राष्ट्रवाद या वेगळ्या गोष्टी आहेत. देशभक्ती आणि राष्ट्रवाद यांतला नेमका फरक काय? आजच्या घडीला काय अधिक उपयुक्त आहे?

– देशभक्तीला भावना लागते, बुद्धी लागत नाही. सध्या आपल्या दुर्दैव असं आहे की, आपण बुद्धीने कमी पण भावनेने मोठे अशा देशभक्तांच्या तावडीत सापडलो आहोत. कितीही हृदयापासून येत असली तरी देशभक्ती ही भावना आहे. राष्ट्रवाद हा वैचारिक मांडणीचा विषय आहे. त्याला अभ्यासाशिवाय पर्याय नाही. अभ्यासू माणसाला तुच्छ लेखून तुम्हाला राष्ट्रवाद मांडता येणार नाही. 'माय कंट्री राइट ऑर राँग' अशी राष्ट्रवादाची व्याख्या सांगितली जाते. पण हे वाक्य अर्धे आहे. मूळ विधान असं आहे, 'माय कंट्री राइट ऑर राँग, इफ राइट टू कीप इट राइट अँड इफ राँग टू सेट इट राइट.' देश बरोबर असेल तर मी त्याला त्या मार्गावर ठेवीन आणि देशाचं काही चुकत असेल तर त्याला मार्गावर परत आणीन, हा जो राष्ट्रवादाचा दृष्टिकोन आहे, त्याच्यासाठी अभ्यास लागेल. अभ्यास करणाऱ्यांची संख्या कमी होते आहे, वस्तुनिष्ठपणे अभ्यास करणाऱ्यांची आणखी कमी होते आहे, आणि वस्तुनिष्ठपणे अभ्यास करून येणारे निष्कर्ष निर्भयपणे समाजापुढे मांडणारे तर शोधावेच लागतील. अभ्यासाशिवाय राष्ट्रवाद नाही आणि तो अभ्यास वस्तुनिष्ठपणे केला नाही तर तो अभ्यासच नाही. त्यामुळे लोकांना देशभक्तीचा मार्ग सोपा वाटतो. "आपला देश महान आहे, हे तुम्हांला सांगणारा मी महान आहे, माझं ऐकणारे तुम्ही महान आहात, आपण सगळे महान आहोत," हे बोलणं सोपं आहे आणि तसं लोक बोलत आहेतच.

**विनय हर्डीकर,** पुणे
vinay.freedam@gmail.com
Mob. 08446554066

संवादक : **विनायक पाचलग**
शब्दांकन : **सुहास पाटील**

(१ ऑगस्ट २०२३ रोजी, पुणे येथील टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने लो.टिळक स्मृती पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रदान करण्यात आला. त्या पार्श्वभूमीवर ही मुलाखत घेतलेली आहे. या मुलाखतीचा व्हिडिओ 'थिंक बँक'च्या यू-ट्यूब चॅनेलवर पाहता येईल. त्यातली काही विधाने इथे दुरुस्त वा अधिक स्पष्ट केली आहेत.)



CamScanner